आरोग्य सेवा

जा.क्र.जिरुसिं/आयुष/२३४ /2025
जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय,
सिंधुदुर्गनगरी दिनांक 05 /05/2025

## दरपत्रक सुची

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा रुग्णालय सिंधुदुर्ग येथे Massagist cum Attendant हे 1 पद बाहयस्त्रोत संस्थेव्दारे भरणेकरीता मार्गदर्शक सूचना प्राप्त झालेल्या आहेत. सदरची बाहयस्त्रोत संस्था निश्चित करणेकरीता दरपत्रक पध्दतीने करणे प्रस्तावित आहे.

त्यासाठी पुरवठादाराकडून खालील अटीच्या अधिन राहून मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. अटींची पुर्तता करणा-या पुरवठादारांनी दरपत्रके खाली सही करणार यांच्या नावे दिनांक 13 / 05 /2025 रोजी दु.3.00 वाजेपर्यंत पोस्टाने किंवा प्रत्यक्ष जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय सिंधुदुर्ग अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियान सिंधुदुर्ग येथे आणून देणेचे आहे. सदर दरपत्रके दिनांक 13/05/2025 रोजी सायं 4.00 वाजता उघडण्यात येतील.

<u>दरपत्रकाच्या अटी व शर्ती</u>

1) संबधित संस्थेचे नोंदणीपत्रक, EPF Certificate, ESIC Certificate, Pan Card इ. कागदपत्रे दरपत्रकासोबत सादर करणे बंधनकारक राहील.
2) नियुक्त सोसायटीने नियुक्त करावयाच्या मनुष्यबळाला किमान वेतन कायदयाआधारे धनादेशाचे माध्यमातुन रोजंदारी देणे बंधनकारक आहे. तसेच Employee Provident Fund, Employee State Insurance Corporation, Professional Tax याबाबत कायदयानुसार पुर्तता करणेची जबाबदारी संस्थेची आहे.
3) कामासाठी नियुक्त करणेत येणारा उमेदवार मान्यताप्राप्त बोर्ड किंवा विदयापीठाकडुन बारावी (HSC) उत्तीर्ण तसेच पंचकर्म तंत्रज्ञचा कोर्स केलेला असणे किंवा पंचकर्म तंत्रज्ञचा किमान 1 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे .
4) कामासाठी नियुक्त करणेत येणारे व्यक्तींकडे आधार कार्ड असणे आवश्यक आहे .
5) कामासाठी नियुक्त करणेत येणारी व्यक्ती प्रकृतीने निरोगी व सुदृध असणे आवश्यक आहे .
6) कामासाठी नियुक्त करणेत येणारे व्यक्तीकडून सदरचे करारपत्र हे कार्यआदेश दिलेनंतर उमेदवार हजर होईल .
7) कामाची वेळ रुग्णालयीन कामकाजाच्या वेळेनुसार राहील.
8) उमेदवाराला कामावर जाणेयेणेचा खर्च तसेच अन्य भत्ते शासनाकडून देय नाहीत .
9) रोजंदारी व्यक्तीने महिन्यातील प्रत्यक्षात काम केलेले दिवस व स्वीकृत दर यांचा गुणाकार करु प्रत्यक्ष येईल त्या रक्कमेचे देयक अदा करणेत येईल .
10) कामाचे देयक दर महिन्याच्या आत 2 तारखेला जिल्हा शल्यचिकित्सक, सिंधुदूर्ग यांचे नावे मुळ प्रतीत सादर करणे बंधनकारक राहिल.
11) देयक अदा करताना शासकीय प्रचलित नियमांनुसार करवजावटी करणेत येतील .
12) उमेदवारांचे देयक नेहमी धनादेशाच्या माध्यमातून बॅंक खातेत जमा करणे बंधनकारक राहील .
13) रोजंदारी व्यक्तीला शासकीय सेवेसाठी अगर इतर कोणत्याही शासकीय हक्कासाठी दावा करता येणार नाही .
14) रोजंदारी व्यक्ती स्वच्छ चरित्र असलेली असावी ती गुन्हेगारी पार्श्वभूमीची असू नये.
15) रोजंदारी व्यक्तीचे काम समाधारकारकतेने, सौजन्यपूर्ण वर्तणूक, नेमून दिलेले काम वेळेत पूर्ण करणे अपेक्षित आहे. मनुष्यबळ पुरविणारे संस्थेकडुन औषधे व साहित्याचे नुकसान झालेस प्रत्यक्ष किंमत एवढी रक्कम वसुल केली जाईल.

Scanned with OKEN Scanner

16) रोजंदारी व्यक्तीला कामावर येताना व जाताना कोणताही अपघात अगर तत्सम इजा किंवा दुखापत झालेस त्याची जबाबदारी ही कंत्राटदाराची राहील. यावर शासन कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देणार नाही.

17) कार्यआदेश दिलेपासुन 7 दिवसात संस्थेने मनुष्यबळ पुरविणे बंधनकारक आहे.

18) कामाची मुदत संपलेनंतर कोणतीही स्वतंत्र सुचना न देता कार्यआदेश संपुष्टात येतील .

19) सेवा पुरविणेचा कालावधी हा मनुष्यबळ हजर झालेल्या दिनांकापासून 31 मार्च 2026 पर्यतचा असेल .

20) मनुष्यबळ पुरविणेची संख्या एक राहील याबाबत आवश्यक सर्व बदलाबाबतचे सर्व अधिकार जिल्हा शल्यचिकित्सक सिंधुदूर्ग यांचेजवळ राहतील, याबाबत कोणत्याही व्यक्ती अगर संस्थेला स्पष्टीकरण मागता येणार नाही अगर न्यायालयात जाता येणार नाही.

जिल्हा शल्यचिकित्सक
सिंधुदुर्ग

Scanned with OKEN Scanner